महाराष्ट्र शासन
**श्री महाराणी ताराबाई शासकीय अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर**
शाहूपुरी ३ री गल्ली, कोल्हापूर
ID: tshrimaharani@yahoo.in, डॉ.लता पाटील, प्र.प्राचार्य
दुरध्वनी क्रमांक/फॅक्स क्र. :- ०२३१ - २५३५०४३ भ्रमणध्वनी क्रं. ९४२३८५९६७३

# १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहीम

**(शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२५/प्र.क्र.७/र व का-१/ दिनांक १३ जानेवारी २०२५)**

उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयान्वये श्री महाराणी ताराबाई शासकीय अध्यापक महाविदयालयामध्ये १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहीम राबविण्यात आली. त्या अनुषंगाने कार्यालयाने केलेल्या सुधारणांचा मुद्देनिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे.

१) **संकेतस्थळ** :- महाविदयालयाची www.smtckop.edu.com ही वेबसाईट अदयावत करण्यात आली आहे. वेबसाईटचे मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषेत अदयावतीकरण करणेसाठी आवश्यक तरतूद मागणी करण्यात आली आहे.

२) **सुकर जीवनमान** :- महाविदयालयामध्ये येणा-या नागरिकांना सुलभ पध्दतीने सेवा पुरविण्यात येतात.

३) **स्वच्छता** :- (अ) महाविदयालयातील द्वितीय वर्ष वर्गामध्ये कागदपत्रांनी भरलेली ३० जुनी कपाटे होती. वर्गामध्ये याची अडचण भासत होती. त्यामुळे या कपाटातील सर्व कागदपत्रांचे वर्गीकरण करुन घेतले. जुने कालबाहय रेकॉर्ड रद्दी घातले आणि त्याची जमा रक्कम चलनाने कोषागारात भरणा केली. आवश्यक ते रेकॉर्ड संबंधित विभागांना हस्तांतरित केले.

(ब) आवारामध्ये मोडलेली ३ कपाटे पडून होती. ती भंगारमध्ये घालून प्राप्त रक्कम चलनाने कोषागारात भरणा केली.

(क) महाविदयालयातील जुन्या मुदतबाहय संगणकांचे निर्लेखन करण्याची कार्यवाही अंतीम टप्प्यामध्ये आहे.

४) **जनतेच्या तक्रारींचे निवारण** : (अ) नागरिकांकडून व तसेच विदयार्थ्यांकडुन कार्यालयास प्राप्त होणा-या सर्व तक्रारींचे त्वरीत निराकरण करण्यात येते. महाविदयालयामध्ये त्यासाठी तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आलेली आहे.

(ब) महाविदयालयामध्ये अभ्यागतांना भेटण्यासाठी राखीव वेळ न ठेवता कोणत्याही वेळी येणा-या अभ्यागतांना तात्काळ भेट दिली जाते व त्यांची कामे केली त्वरीत केली जातात.

५) **कार्यालयातील सोयी व सुविधा :** (अ) कार्यालयातील कर्मचारी , विदयार्थी आणि तसेच येणारे अभ्यागत यांचेकरितां मुख्य इमारतीमध्ये दोन आणि अनेक्स इमारतीमध्ये एक स्वच्छ पिण्याच्या पाण्याची उपकरणे . बसविली आहेत.

(ब) महाविदयालयामध्ये मुलांसाठी आणि मुलींसाठी स्वतंत्र स्वछतागृहे आहेत. या स्वच्छतागृहांची नियमित स्वच्छता करणेसाठी कंत्राटी स्वच्छकाची नियुक्ती करण्यात आली आहे.

(क) महाविदयालयामध्ये येणा-या अभ्यागतांसाठी व्हरांडयामध्ये स्टील बेंच ठेवण्यात आले आहेत.

(ड) महाविदयालयामध्ये ठिकठिकाणी नामफलक व दिशादर्शक फलक लावण्यात आले आहेत.

(इ) महाविदयालयाचे सौदर्यीकरण अंतर्गत व्हरांडयामध्ये फुलझाडांच्या कुंडया ठेवल्या आहेत. आवारामध्ये बगीचा केला असून त्याची नियमित देखभाल केली जाते. महाविदयालयाचा परिसर नियमित स्वच्छ ठेवला जातो. तसेच महाविदयालयातील सर्व वर्ग खोल्यांची व आवाराची नियमित स्वच्छता केली जाते. गांधी पुतळा परिसराचे नुकतेच रुसा निधीमधून नूतनीकरण करण्यात आले आहे. जिल्हा नियोजन समितीकडील उपलब्ध निधीमधून निम्म्या आवारामध्ये कॉक्रीट ब्लॉक बसविण्यात आले असून उर्वरित जागेमध्ये चालू वर्षामध्ये क्रॉक्रीट ब्लॉक बसविणेसाठी प्रस्ताव करण्यात आला आहे.

(ई) महाविदयालयामध्ये कर्मचा-यांसाठी एकमेकांना संपर्क साधणेसाठी इंटरकॉम सुविधा आहे.

(फ) विदयार्थ्यांच्या सुरक्षेसाठी ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत.

**६) गुंतवणूकीस प्रोत्साहन** : लागू नाही

**७) क्षेत्रीय कार्यालयांना भेटी** : लागू नाही.

प्राचार्य
श्री महाराणी ताराबाई शासकीय अध्यापक
महाविद्यालय, कोल्हापूर.